| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| CNR No.**MHKO200001632019** | दाखल तारीख | – | २१ | ०५ | २०१९ |
| | नोंदणी तारीख | – | २१ | ०५ | २०१९ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०६ | ११ | २२ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक २६/२०१९.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक १४९/ब**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १२ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.१५३/२०२२१८ भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | १. | वसंत बळवंत गुरव, व.व.३६ |
| | २. | संजय बापू गुरव, व.व.४८, |
| | ३. | सुरेश बापु गुरव, व.व.३७, |
| | ४. | उत्तम धोंडीराम गुरव, व.व.४१, |
| | ५. | समाधान धोंडीराम गुरव, व.व.३५ |
| | ६. | बापू कृष्णा गुरव, व.व.७४, |
| | ७. | पांडू कृष्णा गुरव, व.व. ८१, |
| | ८. | बळवंत कृष्णा गुरव, व.व.७१, |
| | ९. | किसाबाई बळवंत गुरव, व.व.६६ |
| | १०. | हिराबाई बापु गुरव (मयत नि.क्र.४७) |
| | ११. | संगिता संजय गुरव, व.व. ४४, |

| | | |
|---|---|---|
| | १२. | अलका उत्तम गुरव, व.व.४४ |
| | १३. | तुळसाबाई राजाराम गुरव, व.व.४६ |
| | | सर्व रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही. एस. पाटील |

## भाग–ब
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २८.१२.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २९.१२.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २१.०५.२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २३.०१.२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३.०७.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वसंत बळवंत गुरव, | फौ.प्र.सं. कलम ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | २१.०५.२०१९ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ५०४, ५०६ सह कलम | निर्दोष मुक्तता | – | – |
| २. | संजय बापू गुरव, | | २१.०५.२०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ३. | सुरेश बापु गुरव, | | २१.०५.२०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ४. | उत्तम धोंडीराम गुरव, | | २१.०५.२०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | समाधान धोंडीराम गुरव, | | २१.०५. २०१९ | १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |
| ६. | बापू कृष्णा गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ७. | पांडू कृष्णा गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ८. | बळवंत कृष्णा गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ९. | किसाबाई बळवंत गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| १०. | हिराबाई बापू गुरव (मयत नि.क्र.४७) | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ११. | संगिता संजय गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| १२. | अलका उत्तम गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| १३. | तुळसाबाई राजाराम गुरव, | | २१.०५. २०१९ | | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | राजेंद्र बाळकृष्ण पाटील | घटनास्थळ पंच | ९० |
| २. | दत्तात्रय राघू गुरव | फिर्यादी | ९७ |
| ३. | विद्या दिलीप गुरव | जखमी | १०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | अमोल आनंदा तेली | साक्षीदार | ११७ |
| ५. | दत्तात्रय भाऊ वाळवेकर | साक्षीदार | ११८ |
| ६. | विमल कृष्णात पाटील | साक्षीदार | ११९ |
| ७. | अमित वसंत पाटील | साक्षीदार | १२० |
| ८. | डॉ.गिरीष शरद कांबळे | वैद्यकीय अधिकारी | १२२ |
| ९. | सर्जेराव ज्ञानु पाटील | तपासी अंमलदार | १२८ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ९१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | संयुक्तीकरित्या आर्टीकल अ | घटनास्थळावरील फोटो एकुण चार |
| ३. | ९८ | फिर्याद |
| ४. | १२३ | संभाजी तुकाराम गुरव यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ५. | १२४ | दत्तात्रय राघु गुरव यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | १२५ | रघुनाथ शंकर गुरव एम.एल.सी. यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ७. | १२६ | अदित्य दत्तात्रय गुरव यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ८. | १२७ | गजानन प्रभाकर साळोखे यांचे एम.एल.सी. वैदयकीय प्रमाणपत्र |
| ९. | १२९ | तपासाचा आदेश |
| १०. | १३० | आरोपींना दिलेली फौ.प्र.सं. कलम ४१अ ची नोटीस |
| ११. | १३१ | जखमी संभाजी तुकाराम गुरव यांचा जबाब |
| १२. | १३२ ते १३४ | साक्षीदार क्र.३ अमोल तेली, साक्षीदार क्र.४ विमल पाटील व साक्षीदार क्र.५ दत्तात्रय वाळवेकर यांचे जबाबातील अधोरेखांकित भाग अ |
| १३. | १३५ | जप्ती पंचनामा |
| १४. | १३६ | गुन्हयात वाढीव कलम ३२४ व ३२६ लावलेबाबतचा अहवाल |

## ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

## क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| **अ.क्रं.** | **निशाणी क्रं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १३ | दोषारोप |
| ३. | १३७ ते १४८ | आरोपी क्र.१ ते ९ व ११ ते १३ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब)प्रमाणे निवेदन |

## ड. भौतिक वस्तु

| **अ.क्रं.** | **मुद्देमाल अर्टीकल नं.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | आर्टीकल अ | एक लोखंडी पाते असलेले फावडे त्यास दोन गाठी तीन पेरे असलेला बांबुचा दांडा असलेला. |
| २. | | एक बांबूची काठी तीस तीन गाठी चार पेरे असलेली |
| ३. | | एक बांबूची काठी तीस चार गाठी पाच पेरे असलेली |

| | | |
|---|---|---|
| ४. | एकत्रितरित्या आर्टीकल ब | एक बांबूची काठी तीस चार गाठी पाच पेरे असलेली |
| ५. | | एक बांबूची काठी तीस चार गाठी पाच पेरे असलेली |
| ६. | | एक बांबूची काठी तीस तीन गाठी तीन पेरे असलेली |
| ७. | | एक बांबूची काठी तीस चार गाठी चार पेरे असलेली |
| ८. | | एक बांबूची काठी तीस चार गाठी चार पेरे असलेली |
| ९. | | एक बांबूची काठी तीस तीन गाठी तीन पेरे असलेली |
| १०. | | एक बांबूची काठी तीस तीन गाठी चार पेरे असलेली |
| ११. | | एक बांबूची काठी तीस चार गाठी पाच पेरे असलेली |
| १२. | एकत्रितरित्या आर्टीकल क | जर्मली गोल आकाराचे खोलगट भांडे एक |
| १३. | | एक प्लॅस्टीकचा डबा पांढ–या रंगाचा |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १२ मे २०२६ रोजी घोषित )

आरोपी क्रं.१ ते १३ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,३२६,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादीने त्याचे गट नं.५२२ मध्ये ट्रॅक्टर व जे.सी.बी. द्वारे बंडींग केले असुन सदर शेतातील पाणी फिर्यादीने नळ काढुन त्याचेच गट नं.५०३ मध्ये सोडलेले असतानाही संजय बापू गुरव, सुरेश बापू गुरव वगैरे लोक आले व त्यांनी शेतातील नळा काढुन टाकला. दि.२८/१२/२०१८ रोजी सकाळी ८.३० वाजता चे सुमारास सदर शेतामध्ये फिर्यादीची आई, बहीण, मावस भाऊ बाळासो साळोखे व मावशी आक्काताई प्रकाश साळोखे यांना मारहाण केलेबाबत व ते जखमी झाले असुन उपचाराकरिता सी.पी.आर. येथे असलेबाबत बहीण विद्यादेवी गुरव हिने फिर्यादी कोल्हापूरला असताना फोनवरुन कळवलेवरुन ते सी.पी.आर. येथे गेले. सी.पी.आर. चौकीत त्यांचा मावस भाऊ बाबासो प्रभाकर साळोखे यांनी संजय बापू गुरव वगैरे लोकांविरुध्द तक्रार दिली. त्यानंतर

फिर्यादी व त्यांचे सोबत नातेवाईक सी.पी.आर. येथुन त्यांचे गावी सायंकाळी ५.२० वा. गेले व ते सर्वजन संजय बापू गुरव यांचे दारातुन जात असताना त्यांनी व त्यांचे घरातील सुरेश बापू गुरव, वसंत बळवंत गुरव, उत्तम धोंडीराम गुरव, समाधान धोंडीराम गुरव वगैरे लोकांनी अचानक येवुन फिर्यादी व सोबतच्या लोकांच्या अंगावर तिखट चटणीचे पाणी टाकुन त्या सर्वांना काठी व फावडयाने सर्वांना मारहाण केली. तसेच आरोपींनी त्यांना वाईट वंगाळ शिवीगाळ करुन तुम्हाला आता सोडत नाही अशी धमकी देवुन आरोपींनी फिर्यादी व रघुनाथ शंकर गुरव, संभाजी तुकाराम गुरव यांना काठीने व फावडयाने डोक्यात मारहाण करुन त्यांना डोक्यात जखमा होवून रक्त येवु लागले. तसेच गजानन प्रभाकर साळोखे व मुलगा अदित्य यांनाही आरोपींनी काठीने व लाथाबुक्कयांनी मारहाण केली. त्यामुळे गावातील लोकांनी जखमींना सी.पी.आर. हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार घेतल्यानंतर त्यांनी कळे पोलीस स्टेशनला तक्रार दिली.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र.१५३/२०१८ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८, ३२६,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. डी. पाटील यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, हत्यार जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल पोलीस ठाणेत जमा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२८ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,१४८,३२६,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व

संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.२९ ते ४१ वर नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण नऊ साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. पुरेशी संधी दिलेनंतर नि.क्र.१ कडील दि.०६/०४/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. दरम्यानचे कालावधीमध्ये आरोपी क्रं.१० हिराबाई बापू गुरव हया मयत झाल्यामुळे नि.क्र.१ कडील दि.१६/१२/२०२१ रोजीचे आदेशाने त्यांचेविरुध्दचा खटला अवसान पावला. तद्नंतर आरोपी क्रं.१ ते ९ व ११ ते १३ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नि.क्र.१३७ ते १४८ कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.३०/१२/२०१८ रोजी सायंकाळी ०५.३० वाजताचे सुमारास पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील संजय गुरव यांचे घरा समोर,आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण किंवा हल्ला करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी गुन्हयात वापरलेस मृत्यू होईल अशा प्राणघातक काठी व फावडे घेवून सज्ञ होऊन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४८ सह कलम १४९ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा फावडयाने साक्षीदार संभाजी यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२६ सह कलम १४९ अन्वये अपराध केला? | नकारार्थी. |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा काठीने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये अपराध | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | केला? | |
| ६. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ७. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |
| ८. | आदेश काय ? | आरोपी क्रं.१ ते ९ व ११ ते १३ यांना निर्दोषमुक्त करणेत येते. आरोपी क्रं.१० हे मयत झालेने त्यांचे विरुध्दचा खटला अवसान पावला आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे.

अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.२ दत्तात्रय राघू गुरव **(फिर्यादी/नि.क्र.९७)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, डिसेंबर २०१८ मध्ये अंदाजे दि. २०.१२.२०१८ रोजी गट नं. ४८५ मध्ये त्यांनी ट्रॅक्टर व जे.सी.बी. च्या साहाययाने बंडीग करून घेतले होते. गट नं. ४८५ मधील पावसाचे पाणी नळयाद्वारे त्यांचाच गट नं. ५०३ मध्ये सोडले होते. दि. २८.१२.२०१८ रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास त्यांची बहीण, आई व मावशी व मावस भाऊ असे मिळून गट नं. ४८५ मध्ये शेणखत टाकण्याकरीता गेले होते. त्यावेळी ते ट्रक पासिंगच्या कामाकरीता कोल्हापूरला गेले होते. त्यावेळी आरोपी क्रं. १ ते १३ यांनी सदरचा नळ काढून टाकला. सदरची बाब त्यांना त्यांच्या बहीणीकडून समजली. आरोपी क्रं. १ ते १३ यांनी त्यांची बहीण, आई व मावशी यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांचे मावस भाऊ गजानन साळोखे यांनी त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे घेवून जात असल्याचे त्यांना त्यांच्या बहीणीकडून समजले.सी.पी.आर. हॉस्पीटल मध्ये जमखींवर उपचार करण्यात आले. त्याचदिवशी सायंकाळी ४.३० च्या सुमारास जखमींना डिस्चार्ज मिळाल्यानंतर ते पाटपन्हाळा या गावी निघाले व सायंकाळी ५.३० च्या सुमारास गावात पोहोचले.

**०९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ दत्तात्रय राघू गुरव यांचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, जखमींना घेवून त्यांनी घरात सोडून ते घराच्या बाहेर आले असता गजानन साळोखे, संभाजी गुरव, रघुनाथ गुरव, आदित्य गुरव यांनी त्यांच्या ताब्यातील वाहने लावून त्यांच्या घराच्या दिशेने चालत येत असताना आरोपी क्रं. १ ते १३ यांच्या घराजवळ असलेल्या कट्टयाजवळ दबा धरून बसले होते. आरोपी क्रं. ९ ते

१३ यांनी चटणी पुडचे पाणी त्यांच्या लोकांच्या अंगावर फेकले व त्यांना सोडायचे नाही असे म्हणाले. त्यानंतर आरोपी लोक मारण्यासाठी पळत आले. त्यांना उत्तम गुरव, सुरेश गुरव, संजय गुरव, बापू गुरव यांनी काठीने मारहाण केली. संभाजी गुरव यांना वसंत गुरव यांनी त्यांच्या डोक्यात फावडे मारले. त्यात त्यांचे डोके फुटले. रघुनाथ गुरव यांना किसाबाई गुरव, बळवंत गुरव, संगिता गुरव, सुरेश गुरव यांनी काठीने मारहाण केली. गजानन साळोखे यांना बापू गुरव, समाधान गुरव, बळवंत गुरव, तुळसाबाई गुरव, अलका गुरव यांनी काठीने मारहाण केली.राजेंद्र पाटील, शिवलिंग तेली यांनी त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. हॉस्पीटल येथे नेले. त्याठिकाणी त्यांच्यावर उपचार केले. त्यांनी सी.पी.आर. हॉस्पीटल, लक्ष्मीपूरी चौकी येथे नि. ९८ अन्वये फिर्याद दिली. संभाजी गुरव यांना जास्त त्रास सुरू झाल्याने त्यांना पुढील उपचाराकरीता सी.टी. हॉस्पीटल, कोल्हापूर याठिकाणी नेण्यात आले. जी.पी. नंबर ३२/२०१९ वरील आर्टिकल अ वर दाखल असलेले फावडे तेच असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर आर्टिकल ब वर दाखल असलेल्या काठया त्यांनी ओळखल्या. आरोपी लोकांनी त्यांच्या अंगावर चटणी पुडचे पाणी ज्या भांडयातून पाणी ओतले ते जर्मनचे पातेले व प्लॉस्टीकचा डबा, आर्टिकल क वरील वस्तू त्यांनी ओळखल्या आहेत.

**१०.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ विद्या दिलीप गुरव **(जखमी साक्षीदार/नि.क्र.१०८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२८.१२.२०१८ रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास त्या, त्यांची आई सखुबाई व मावशी आक्काताई या घळण नावाच्या शेतात खत टाकण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी त्यांच्या शेतात पावसाचे पाणी बाहेर जाण्याकरीता नळा टाकला होता. त्यावेळी त्यांचा भाऊ गाडी पासिंगकरीता कोल्हापूर येथे गेले होते. त्यावेळी ५–६ आरोपींनी त्यांच्याकडे येथे नळा का घातला अशी विचारणा केली असता त्यांनी त्यांना माझा भाऊ आल्यावर विचारा असे सांगितले. त्यावर त्यांनी सदरचा नळा काढून टाकला.

सदर ५–६ आरोपींनी त्यांना काठीने मारहाण केली त्यांची नावे आरोपी क्रं. १ बापू गुरव, आरोपी क्रं. २ संजय गुरव, आरोपी क्रं. ३ उत्तम गुरव, आरोपी क्रं. ४ सुरेश गुरव, आरोपी क्रं. ५ बळवंत गुरव, आरोपी क्रं. ६ पांडु गुरव अशी आहेत. त्यांचा दंगा ऐकून उस तोडणारे गडी व शेजारच्या शेतात पाणी देणारा त्यांचा मावस भाऊ त्याठिकाणी आला. त्यांचा मावस भाऊ गजानन साळोखे याने त्याच्या तवेरा गाडीतून त्यांना उपचाराकरीता सी.पी.आर. येथे नेले. घटनेची तक्रार त्याने सी.पी.आर. चौकीला दिली. त्यांना सायंकाळी ४.३० च्या सुमारास डिस्चार्ज देण्यात आला. डिस्चार्ज दिल्यानंतर सायंकाळी ५.३० च्या सुमारास ते गावात पोहोचले. त्यांचा मेव्हणा संभाजी तुकाराम गुरव याला फावडे डोक्यात मारले. सदरचे फावडे वसंत गुरव याने संभाजी गुरव यांच्या डोक्यात मारले. त्यांचा मोठा भाऊ दत्तात्रय गुरव याला आरोपी संजय गुरव व उत्तम गुरव यांनी काठीने मारले. त्यांनी त्यांचे भाऊ दत्तात्रय गुरव, संभाजी गुरव, रघुनाथ गुरव व गजानन गुरव यांना आरोपी क्रं. १ ते १३ यांनी मारहाण केली. आरोपी अलका, तुळसा, संगिता, हिराबाई व किसाबाई यांनी चटणीचे पाणी त्यांच्या भावाच्या अंगावर फेकले. त्यानंतर त्यांच्या गावातील अमोल तेली यांच्या गाडीतून त्यांच्या भावाला सी.पी. आर. येथे उपचाराकरीता नेले. ज्या फावडयाने त्यांचा मेव्हणा संभाजी गुरव याला मारले ते आर्टिकल अ वर दाखल आहे. आर्टिकल ब वर १० काठया दाखल आहेत व आर्टिकल क वर प्लास्टीकचा डबा व जर्मन भांडे दाखल आहेत.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ अमोल आनंदा तेली **(साक्षीदार/नि.क्र.११७)** व अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.६ विमल कृष्णात पाटील **(साक्षीदार/नि.क्र.११९)** यांनी अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहाय्य केले नसल्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षाकरिता निरुपयोगी ठरली असल्याने त्यांची साक्ष विचारात घेता येणार नाही.

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय भाऊ वाळवेकर

**(साक्षीदार/नि.क्र.११८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सन २०१९ साली ते ऊस तोडणी कामगार म्हणुन काम करत होते. ते दत्तात्रय गुरव यांचे ट्रकवर काम करत होते. दि.२८/१२/२०१८ रोजी राजाराम केरबा कांबळे यांचे शेतातील ऊस तोडणीचे काम चालले होते. ते सकाळी ७.३० चे सुमारास शेतात गेले. सकाळी ८.३० च्या सुमारास खालच्या शेतातून आवाज ऐकू आला त्यावरुन ते ज्या ठिकाणाहुन आवाज आला त्या ठिकाणी पोहोचले. त्या ठिकाणी त्यांनी जावुन भांडणाची सोडवासोडव केली. सदर शेतात दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांची भांडणे लागली होती. त्यांनी त्या ठिकाणी केवळ भांडणे सोडवण्याचे काम केले आहेत. तो आरोपींना ओळखतो कारण त्यांच्याच गाववाले आहेत.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.७ अमित वसंत पाटील **(साक्षीदार/नि.क्र.१२०)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२८.१२.२०१८ रोजी ते राजाराम केरबा कांबळे यांच्या शेतातील ऊस तोडणीचे काम करत होते. ते सकाळी ७.३० च्या सुमारास शेतात गेले होते. सकाळी ८.३० च्या सुमारास खालच्या शेतातून त्यांना आवाज ऐकू आला. त्यावरून त्यांना ज्या ठिकाणाहून आवाज आला. त्याठिकाणी ते पोहोचले. त्याठिकाणी जावून त्यांनी भांडणाची सोडवासोडव केली. सदर शेतात दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांची भांडणे लागली होती. त्यांनी त्या ठिकाणी केवळ भांडणे सोडविण्याचे काम केले आहे.

**१४.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ राजेंद्र बाळकृष्ण पाटील **(घटनास्थळ पंच /नि.क्र.९०)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.३०.१२.२०१८ रोजी त्यांना पाटपन्हाळा येथील गुरव गल्लीत पंचनामा करणेसाठी बोलावले होते. घटनास्थळा पंचनामा दत्तात्रय गुरव यांच्या घरासमोर नोंदविण्यात आला. पोलीसांनी त्यांच्या समक्ष भांडणाच्या जागेचा पंचनामा केला. घटनास्थळ त्यांना व पोलीसांना फिर्यादी दत्तात्रय गुरव यांनी दाखवले. घटनास्थळाच्या पूर्व–पश्चिमेस गल्ली आहे.

दक्षिणेला संग्राम गुरव यांचे घर आहे. उत्तरेला कृष्णात पाटील यांचे घर आहे. पोलीसांनी त्यांच्या समक्ष दिसत्या परिस्थितीचा नि.९१ वर दाखल असलेला पंचनामा नोंदविला. त्यांच्या सोबत दुसरे पंच शिवलिंग तेली हजर होते. घटनास्थळ पंचनामा दुपारी ४ वाजता सुरू होवुन ४.४५ वाजता संपला. आर्टिकल अ वरील फोटो त्यांनी तेच असल्याचे सांगितले आहे.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ डॉ. गिरीष शरद कांबळे **(वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.१२२)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.२८.१२.२०१८ रोजी रात्री ८.१५ च्या सुमारास त्यांनी जखमी संभाजी तुकाराम गुरव, दत्तात्रय राघू गुरव, रघुनाथ गुरव, आदित्य गुरव व गजानन साळोखे यांना तपासले. ते उपचाराकामी पोलीस यादीसह आले होते. दि.२८.१२.२०१८ रोजी त्यांनी एम.एल.सी.नं.१६६१८/१८ अन्वये संभाजी गुरव यांना तपासले. त्यांना डोक्याला, मानेला, खांदयावर व डाव्या हाताला फ्रॅक्चर असल्याचे दिसून आले. त्यानुसार त्यांनी नि.१२३ अन्वये एम.एल.सी. देवू केली. त्यानंतर त्यांनी जखमी दत्तात्रय राघु गुरव एम.एल.सी.नं१६६२१/२०१८ अन्वये तपासले. त्यांना डोक्याला, कपाळावर मार बसला होता. त्यानुसार त्यांनी नि.१२४ वरील एम.एल.सी. देवू केली. त्याचदिवशी त्यांनी जखमी रघुनाथ शंकर गुरव एम.एल.सी.नं.१६६१७/१८ अन्वये तपासले असता जखमीला हाताच्या कोपराला व इतर ठिकाणी जखमा झाल्या होत्या. त्यामुळे त्यांनी नि. १२५ वरील एम.एल.सी. देवू केली. त्याच दिवशी त्यांनी आदित्य दत्तात्रय गुरव याला एम.एल.सी.नं.१६६१९/१८ अन्वये तपासले. त्यांना झालेल्या जखमांबद्दल नि. १२६ अन्वये एम.एल.सी. देवू केली. त्यानंतर त्यांनी त्याच दिवशी जखमी गजानन प्रभाकर साळोखे यांना एम.एल.सी.नं.१६६२०/१८ अन्वये तपासले. त्यांना उजव्या हाताच्या मधल्या बोटाला मार लागला होता. त्यानुसार त्यांनी नि. १२७ अन्वये त्यांचे एम.एल.सी. देवू केले.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.९ सर्जेराव ज्ञानु पाटील **(तपासी अंमलदार/नि.क्र.१२८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, गु.र.नं. १५३/२०१८ चा तपास करणेकामीचा लेखी आदेश ठाणे अंमलदार धनवडे यांनी गुन्हा नोंद करून पोलीस निरीक्षक देसाई यांनी नि.१२९ वरील आदेश दिला. लेखी आदेशासोबत फिर्याद, दवाखाना वर्दी, छापील प्रथम खबरी अहवाल या बाबी त्यांना प्राप्त झाल्या होत्या.त्यानंतर त्यांनी दि.३०.१२.२०१८ रोजी फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदविला. घटनास्थळ हे पाटपन्हाळा या गावी फिर्यादी व त्यांच्या गल्लीत असून त्यांनी दोन पंचासमक्ष नि.९१ वरील घटनास्थळ पंचनामा नोंदविला. आर्टिकल अ वरील घटनास्थळाचे फोटो काढले. दि.०१/०१/२०१९ रोजी सदर गुन्हयाचे अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(अ) ची नि.१३० वरील नोटीस दिली. जखमी संभाजी गुरव यांचा जबाब त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला. तो बरोबर आहे. तो नि.१३१ वर आहे. त्याचबरोबर साक्षीदार क्रं. ३ अमोल तेली, साक्षीदार क्रं.४ विमल पाटील, साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय वाळवेकर यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला असून नि.१३२ ते १३४ वर दाखल आहे. दि.०३.०१.२०१९ रोजी तुम्ही हजर केलेली व गुन्हयात वापरलेली हत्यारे पंचनाम्याद्वारे जप्त करून घेतली व नि.१३५ वरील जप्ती पंचनामा नोंदविला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून ते प्रस्तुत कामात सामील केले. सदर गुन्हयास वाढीव कलम ३२४ व ३२६ लावले बाबतचा अहवाल नि.१३६ अन्वये सादर केला. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले.

**१७.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१८.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ दत्तात्रय राघू गुरव **(फिर्यादी/नि.क्र.९७)** यांचे आरोपींचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी असे कबुल केले आहे की, ते आरोपी क्रं. १ ते १३ यांना ओळखतात कारण ते त्यांचे नातेवाईक आहेत. आरोपी क्रं. १० हिराबाई गुरव हे सध्या मयत आहेत. त्यांचे त्यांच्या गावातील लोकांशी चांगले संबंध आहेत. भु.गट क्रं. ४८५ ला मालकी सदरी यापूर्वी व आजरोजी देखील त्यांच्या नावाची नोंद नाही. भू. गट नं. ४८५ या शेतीला घळण नावाची शेती म्हणून ओळखतात. भू. गट क्रं. ४८५ च्या शेजारी आरोपींची शेती आहे. आरोपीच्या शेतीचा गट नं. ५०१ असा आहे. गट नं. ४८५,५०१,५११ व ४३४ या जमिनीतील पावसाचे पाणी वाहून जाण्याकरीता पूर्वीपासून ओढा अस्तिवात आहे. दि. २८.१२.२०१८ रोजी फिर्यादीची आई, मावशी व बहीण घळण नावाच्या शेतात गेल्या होत्या. दि. २८.१२.२०१८ रोजी त्यांच्या घळण नावाच्या शेतात काय घटना घडली याविषयी त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. दि. २८.१२.२०१८ च्या घटनेविषयी त्यांनी जी सरतपासात कथने केली आहेत ती त्यांच्या बहीणीच्या सांगण्यावरून केली आहेत. त्यांनी स्वतःहून सी.पी. आर. हॉस्पीटल मध्ये आरोपींविरूध्द तक्रार दिलेली नाही. उर्वरीत प्रश्नांना नाकबूल उत्तरे नोंदविली.

**१९.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ सौ विद्या दिलीप गुरव **(जखमी/नि.क्र.१०८)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, फिर्यादी दत्तात्रय गुरव हे त्यांचे भाऊ असून आरोपी क्रं. १० हिराबाई गुरव ही सध्या मयत आहे. त्या आरोपी क्रं. १ ते ९ व ११ ते १३ यांना ओळखतात कारण ते त्यांच्या भावकीतील आहेत. प्रस्तुतची केस गट नं. ४८५ मधील पाईपच्या कारणावरून दाखल झालेली आहे. गट नं. ४८५ ला लागून आरोपींची शेती आहे. गट नं. ४८५ या शेतीला घळण नावाची शेती म्हणून ओळखले जाते. उस वाहतूकीसाठी, तोडणीसाठी, भरणीसाठी जे कामगार लागतात ते सर्व कामगार त्यांच्या गावातील आहेत. रघुनाथ गुरव हे त्यांचे सख्खे भाऊ असून गजानन प्रभाकर साळोखे हा त्यांचा मावस भाऊ

आहे. व आदित्य गुरव हा त्यांचा भाचा आहे. दत्तात्रय वाळवेकर अमित पाटील व राजाराम कांबळे ही त्यांच्या भावाच्या टोळीतील कामगार असून ते वेळ पडल्यास त्यांच्या शेतात देखील काम करतात. उस तोडणी कामगारांना उस तोड कंत्राटदाराकडून आर्थिक अडचणीकरीता उसनवार उचल पैसे किंवा आगाऊ रक्कमा दिल्या जातात. उस कामगार हे त्यांच्या भावाकडून उसनवार पैसे घेतल्याने आर्थिक व्यवहारात अडकलेले आहेत. गट नं. ४८५ मधील क्षेत्र हे ते व त्यांचे पै–पाहुणे मिळून करतात. डिसेंबर २०१८ मध्ये गट नं. ४८५ या घळण नावाच्या शेतामध्ये त्यांच्या भावांने बंडीग केले होते. सदर बंडीगमध्ये पूर्वापार चालत असलेला नाळा त्यांच्या भावाने मोडला व तेथून नवीन प्रवाह चालू केला होता. आरोपीने त्यांच्या भावाला व मावशीला पूर्वापार चालत असलेला पाण्याचा पाईप घाला असे सांगितले होते. त्यांनी त्यांच्या भावाने व मावशीने सदर पाण्याच्या पाईपचा प्रवाह बदललेला नव्हता. बंडीग केलेल्या शेतात कोणतेही पिक नव्हते. ते फक्त खत टाकण्यासाठी गेले होते. ज्या दिवशी ते खत टाकायला गेले त्यावेळी घळण नावाच्या शेती नुकतीच चार दिवसापूर्वी बंडीग केली होती. त्यामुळे सदर शेतीला बांध अस्तीत्वात नव्हते. त्यांची आई व मावशी पडल्यानंतर त्यांना मदत करण्याकरीता त्यांनी इतरांची देखील मदत घेतली होती. त्यांच्या मदतीने त्यांनी आईला व मावशीला घरी आणले. आरोपीने त्यांच्याविरूध्द रे.क्रि.केस नं. २७/२०१९ हे प्रकरण दाखल केले होते. प्रस्तुतची केस आरोपीविरूध्द त्यांचा भाऊ दत्तात्रय गुरव यांनी दाखल केलेली आहे. नियमित फौजदारी खटला २७/२०१९ मध्ये आरोपी क्रं.१ दत्तात्रय गुरव हे होते. आदित्य गुरव, गजानन साळोखे यांनी त्यांच्यासोबत उपचार घेतले नाहीत. प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल त्यांच्या भावाने पोलीसांकडे जमा केला आहे. कोणत्या आरोपीने कोणत्या काठीने मारहाण केली हे ते निश्चित सांगू शकले नाही. नेमक्या किती काठया घेवून आरोपी त्यांना मारायला आले हे देखील ते सांगू शकले नाहीत. त्यांच्या राहत्या घराच्या दारात भांडणे झाली आहेत. त्या घरी विश्रांती घेत असल्याने गावात काय चालले आहे याची त्यांना माहीती नाही.

त्यांच्या गल्लीचा रस्ता त्यांच्या घरापर्यंत आहे. त्यांच्या घराच्या दारापर्यंत चारचाकी वाहन सहजरित्या येते. सी.पी.आर. हॉस्पीटलमधून उपचार घेवून आल्यानंतर ते थेट त्यांच्या घराच्या दारात उतरल्या व दारातून घरात पायी चालत गेल्या. तेली गल्ली किंवा गुरव गल्लीमध्ये एकूण २५ घरे आहेत. संध्याकाळच्या वेळी त्यांच्या गल्लीतील लोक आपआपल्या घरी असतात. आरोपींनी त्यांच्या शेतातील पाण्याचा नळा काढून टाकला याचा राग मनात धरून त्यांनी प्रस्तुतची केस दाखल केली आहे.

२०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय भाऊ वाळवेकर **(साक्षीदार/नि.क्र.११८)** व अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं. ७ अमित वसंत पाटील **(साक्षीदार/नि.क्र.१२०)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांचे दत्तात्रय गुरव यांच्यासोबत चांगले संबंध आहेत. रेवटा याठिकाणी राजाराम कांबळे यांची शेतजमिन नाही. त्यांच्यासमक्ष कोणी कोणालाही मारहाण केली नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब पोलीस स्टेशनमध्ये नोंदवून घेतला आहे. पोलीसांनी त्यांच्या जबाबत काय लिहून घेतले आहे याविषयी त्यांना माहिती नाही. दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांच्यात काय भांडणे झाली याविषयी त्यांना माहित नाही अशी साक्ष नोंदविली आहे.

२१. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ राजेंद्र बाळकृष्ण पाटील **(घटनास्थळ पंचनामा/नि.क्र.९०)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, दत्तात्रय गुरव व वसंत गुरव इतर आरोपी हे त्यांच्या गावातील असल्याकारणाने ते त्यांना ओळखतात. दत्तात्रय गुरव व वसंत गुरव यांच्यात जमिनीच्या कारणावरून वाद आहेत. घटनास्थळ हे त्यांच्या रोजच्या पाहण्यातील असल्याकारणाने त्यांना त्याच्या चतुःसिमा माहित आहेत. सदर पंचनामा करणेकामी त्यांना फिर्यादीने बोलावले नव्हते. घटनास्थळ पंचनामा त्यांनी व्यक्तिशः वाचून पाहिला नाही. केवळ कॉन्स्टेबल पाटील यांच्या सांगण्यावरून सहया केल्या. प्रस्तुत प्रकरणातील पंचनामा त्यांनी न्यायालयात

आल्यावर वाचून पाहिलेला आहे. पंचनाम्यातील मजकूर वाचून पाहिला असल्याकारणाने ते जबाब देत आहेत.

२२. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ डॉ. गिरीष शरद कांबळे **(वैद्यकीय अधिकारी/नि.क्र.१२२)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांच्या हॉस्पीटलमध्ये जनरल रजिस्टर मेन्टेन केले जाते. त्यामध्ये पेशंटचे नाव, केस पेपर आणि वैद्यकीय प्रमाणपत्र या सर्व बाबींची नोंद त्यांचा स्टाफ घेतो. सदर रजिस्टरमध्ये रूग्णाला कोणी आणले याविषयी देखील नोंद असते. सदरचे जनरल रजिस्टर त्यांनी साक्ष कामी येताना सोबत आणलेले नाही. सदर वैद्यकीय प्रमाणपत्रावरून पेशंट हा पोलीस यादीसह आला होता ही बाब नमूद नाही. पोलीसांच्या विनंतीवरून त्यांनी जखमीला वैद्यकीय प्रमाणपत्र देवू केले. जर एखादी व्यक्ती पाय घसरून जमिनीवर पडली तर वर नमूद जखमा होवू शकतात असा अनुमान त्यांनी वर्तविला.

२३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.९ सर्जेराव ज्ञानु पाटील **(तपासी अंमलदार/नि.क्र.१२८)** यांनी त्यांचे उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, त्यांना दिलेल्या लेखी आदेशावर आवक जावक क्रमांक नमूद नाही. जप्त मुद्देमाल हा त्यांनी आरोपींकडून जमा केलेला आहे. जखमींच्या रक्तांचे नमूने घेतलेले नाहीत व तपासकामी तसा सी.ए. अहवाल देखील प्राप्त केलेला नाही. घटनास्थळावरून चटणी अथवा चटणी सदृश्य पदार्थ जप्त केलेला नाही. घटनास्थळावरून चटणीच्या पाण्याचे डाग देखील आढळून आले नव्हते. त्यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले असून साक्षीदार बाबासो साळोखे, विद्या गुरव, सखुबाई गुरव, आक्काताई साळोखे यांनी दि. २८.१२.२०१८ रोजी सी.पी. आर. हॉस्पीटल कोल्हापूर येथे उपचार घेतलेबाबत कोणताही कागद प्रस्तुत कामात दाखल केलेला नाही.

२४. एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री

पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.२ फिर्यादी दत्तात्रय राघु गुरव यांच्यात व आरोपींमध्ये अनेक प्रकरणे दाखल असून भुगट क्रंमांक ४८५ च्या शेजारी आरोपींची शेती आहे. दि. २८.१२.२०१८ रोजी घळण नावाच्या शेतात काय घटना घडली याविषयी त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. केवळ बहीणीच्या सांगण्यावरून साक्ष देत असल्याचे मान्य केले. साक्षीदार क्रं.३ विदया दिलीप गुरव यांनी प्रस्तुतची केस गट नं. ४८५ मधील पाईपच्या करणावरून दाखल झाली आहे. गट नं. ४८५ ला लागून आरोपीची शेती उत्तर दिशेला आहे. गट नं. ४८५ ला घळण या नावाने ओळखले जाते. उस कामगार हे त्यांच्या भावाकडून उसणवार पैसे घेतात त्यामुळे त्यांचे आर्थिक व्यवहार अडकलेले आहेत. त्यांच्या भावाने व मावशीने सदर पाण्याचा पाईपचा प्रवाह बदललेला नव्हता. साक्षीदार क्रं.४ अमोल तेली व साक्षीदार क्रं.६ विमल पाटील यांनी अभियोग पक्षास कोणत्याही प्रकारे साहाय्य केले नसल्याने त्यांची साक्ष अभियोग पक्षाकरीता निरूपयोगी ठरलेली आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.५ दत्तात्रय वाळवेकर व सक्षीदार क्रं.७ अमित वसंत पाटील यांनी रेवटा याठिकाणी राजाराम कांबळे यांची शेतजमिन नाही. त्यांच्या समक्ष मारहाणीची घटना घडली नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब पोलीस स्टेशनमध्ये नोंदवून घेतला होता. पोलीसांनी त्यांचया जबाबात काय लिहून घेतले आहे. याविषयी त्यांना माहित नाही. दत्तात्रय गुरव व संजय गुरव यांच्यात काय भांडणे झाली याविषयी देखील त्यांना माहित नाही.

**२५.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.८ डॉ. गिरीष शरद कांबळे यांनी साक्षकामी येताना त्यांच्या हॉस्पीटलमधील जनरल रजिस्टर व त्यातील अद्ययावत माहिती सोबत घेवून येणे अपेक्षित होते. साक्षीदार क्रं. ९ सर्जेराव ज्ञानू पाटील तपासी अंमलदार यांनी जखमीने सी.पी.आर. हॉस्पीटल मध्ये उपचार घेतल्याबाबतची कागदपत्रे प्रस्तुत कामात दाखल केलेली नाही. त्याचबरोबर जखमींच्या रक्तांचे नमुने घेतलेले नाहीत. घटनास्थळावरून चटणी अथवा चटणी सदृश्य पदार्थ जप्त केला नाही. प्रस्तुत प्रकरणाचा तपासी अंमलदार यांनी अपुरा तपास केल्याची बाब समोर येते.

तपासी अधिकारी यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. तसेच घटनास्थळ पंचनामा तसेच जप्ती पंचनामा सक्तरित्या शाबित केलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही किंबहुना सुसंगत नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांवरून हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्देश साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र अपराध केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.**

**प्रश्नबिंदू क्र.८ करीताः**

**२६.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल आर्टिकल अ वरील लोखंडे फावडे याचा लिलाव करून येणारी रक्कम सरकारी खात्यात वर्ग करण्यात यावी. आर्टिकल ब वरील १० बांबुच्या काठया, आर्टिकल क वरील जर्मल खोल आकाराचे खोलगट भांडे व एक प्लास्टीकचा पांढ–या रंगाचा डबा आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र. ८ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे–

**आदेश**

१. आरोपी क्र.१ वसंत बळवंत गुरव, आरोपी क्र.२ संजय बापू गुरव, आरोपी क्रं.३ सुरेश बापू गुरव, आरोपी क्र.४ उत्तम धोंडीराम गुरव,

आरोपी क्रं.५ समाधान धोंडीराम गुरव, आरोपी क्रं.६ बापू कृष्णा गुरव, आरोपी क्रं.७ पांडू कृष्णा गुरव, आरोपी क्रं.८ बळवंत कृष्ण गुरव, आरोपी क्रं.९ किसाबाई बळवंत गुरव, आरोपी क्रं.११ संगिता संजय गुरव, आरोपी क्रं.१२ अलका उत्तम गुरव, आरोपी क्रं.१३ तुळसाबाई राजाराम गुरव सर्व रा. पाटपन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,३२६,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ प्रमाणे चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपी क्रं.१० हिराबाई बापू गुरव ही प्रस्तुत खटला चालू असताना मयत झाल्याने तिच्याविरूध्द प्रस्तुतचा खटला अवसान पावला.

३. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

४. आरोपी क्रं.१ ते ९ व ११ ते १३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

५. जप्त आर्टिकल अ वरील लोखंडे फावडे याचा लिलाव करून येणारी रक्कम सरकारी खात्यात वर्ग करण्यात यावी. आर्टिकल ब वरील १० बांबुच्या काठया, आर्टिकल क वरील जर्मल खोल आकाराचे खोलगट भांडे व एक प्लास्टीकचा पांढ-या रंगाचा डबा आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:15:19 +0530

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे-खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक -१२.०५.२०२६.
कळे-खेरीवडे.